# के. के. वाघ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश



म. टा. प्रतिनिधी, नाशिक

## कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये १४ जणांची निवड

शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाव्यात, यासाठी के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये सध्या कॅम्पस इंटरव्ह्यू प्रक्रिया राबविण्यात येत आहे. फेडरल बँक, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, जारो एज्युकेशन आणि जेईई इंजिनीअरिंग या कंपन्यांकडूनही नुकतीच कॅम्पस इंटरव्ह्यु प्रक्रिया घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांपर्यंत पॅकेज देण्यात आले आहेत.

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल, कम्प्युटर, आयटी, सिव्हील आणि ई. अॅन्ड टी. सी, अशा सर्व शाखांसाठी ही प्रक्रिया पार पडली. कॉलेजमधील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटरमध्ये घेण्यात आली. सरासरी ६० टक्के असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभाग घेता आला. प्री प्लेसमेंट चर्चेद्वारे कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज आदी माहिती देण्यात आली. या सर्व कंपनीच्या मुलाखती ऑनलाइन टेस्ट, टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखती या टप्प्यांतून पार पडली.

यामध्ये फेडरल बँकेत निवड झालेल्या चार विद्यार्थ्यांना चार लाख, जारो एज्युकेशनमध्ये २ विद्यार्थ्यांची निवड झाली असुन त्यांना १२ लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले. तर ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्याला १४ लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले, तर जेएफई इंजिनीअरिंगमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यालाही चार लाख रुपयांचे पॅकेज मिळाले असल्याची माहिती कॉलेजचे ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली आहे.